# देशोदेशीचे निषेध

## चन्द्रशेखर पुरन्दरे

आहे-रे आणि नाही-रे गटातील तफावत जगभर वेगाने वाढत आहे. त्याविरुद्धचे उद्रेकही वाढत आहेत. ऑक्सफॅम या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संघटनेच्या या वर्षीच्या प्रकाशनानुसार जगातील सर्वात श्रीमंत २६ लोकांकडे जेवढी संपत्ती आहे, तेवढी जगाच्या निम्म्या लोकसंख्येकडे आहे. या अतिधनाढ्य गटाची संपत्ती रोज अडीच अब्ज डॉलर्सने वाढते. तर जगातील ३.८ अब्ज गरीबांची संपत्ती रोज ५० कोटी डॉलर्सने कमी होते.

हे तर आर्थिक चित्र झाले. इतरही अनेक प्रवाह अशांततेला कारणीभूत असतात - हुकूमशाही, बेरोजगारी, शासकीय भ्रष्टाचार, निवडणुकांतील हेराफेरी, वगैरे. या पार्श्वभूमीवर जगभर उसळत असलेल्या असंतोषाच्या लाटा पाहू.

द. अमेरिका खंडापासून युरोप, आफ्रिका, मध्यपूर्व, आशिया या सगळ्या खंडांत लोक हजारोंनी व अनेकदा लाखोंनी रस्त्यावर येत आहेत. शासकीय हिंसेने बळी पडत आहेत. अल्जीरिया, बोलिव्हिया, रशिया, युक्रेन, सर्बिया, कॅटालोनिया [स्पेन], ब्रिटन, ब्राझील, पेरू, चिली, कोलंबिया, इक्वेडोर, फ्रांस, गायना, हैती, होंडुरास, हाँग काँग, इराक, इराण, कझाकस्तान, लेबनॉन, पाकिस्तान, लेख लिहिण्याच्या वेळी इराण. हे तर या वर्षातील.

प्रत्येक ठिकाणी निषेध निराळ्या व स्थानिक कारणाने सुरु होतो पण तो जसा वाढतो, तशा मागण्या बदलत जातात. प्रत्येक निषेधाची सखोल कारणमीमांसा लेखमर्यादेत शक्य नाही. पण निषेधांचे वैविध्य समजण्यासाठी काही देशांत ते काय कारणाने सुरू झाले ते पाहू. काही उदाहरणे जरा विस्ताराने, इतर त्रोटक दिली आहेत.

### द. अमेरिका

**बोलिव्हिया** या देशातील निर्वाचित अध्यक्ष इवो मोरालेस गेल्या दीड शतकातील पहिलाच भूमिपुत्र अध्यक्ष. त्याआधीचे गोरे होते. २००५ साली तो प्रथम अध्यक्ष झाला व त्याने डावी धोरणे राबवली. त्यात अमेरिका, बहुराष्ट्रीय उद्योग, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या धोरणांशी फारकत घेतली. त्याची अलीकडची अध्यक्षीय निवडणूक विवाद्य ठरली. त्याचा विजय हेराफ़ेरीच्या मतदानातून झाला असा सार्वत्रिक संशय आला व लोक त्याविरुद्ध रस्त्यावर आले. शेवटी नोव्हेंबरमध्ये तो देश सोडून मेक्सिकोला पळून गेला. यात अमेरिका, आंतरराष्ट्रीय भांडवल यांची लोकांना चिथावणी असावी असा संशय येतो. म्हणजे प्रत्येक जन-निषेध न्याय्य असेलच असे नाही. मुद्दा हा की या निवडणुकीत हेराफेरी झाली असली तरी मोरालेसचे धोरण सरसकट त्याज्य ठरत नाही. पण लोकांच्या आंदोलनांच्या दबावाखाली झालेल्या त्याच्या पदच्युतीने नेमका तो परिणाम होणे शक्य आहे आणि ते देशाला हितावह नाही. [त्याच्या समर्थकांनी प्रत्युत्तर म्हणून निदर्शने सुरू केली. त्यात ५ जण ठार झाले.]

**चिली** हा देश संपन्न असूनही तिथे अंतर्गत विषमता तीव्र आहे. तेथे राजधानीतील मेट्रोचे तिकिट महाग झाल्याचे निमित्त झाले. पण दर कमी करूनही निषेध चालू आहेत - महागाई, सामाजिक विषमता, इत्यादींविरुद्ध. त्यात १८ जण ठार झाले आहेत.

### युरोप

**स्पेन** येथील कॅटालोनिया प्रांताला स्पेनपासून विभक्त व्हायचे आहे. ही मागणी ऐतिहासिक आहे. तिने २०१० पासून जोर धरला. बंद, सार्वमत अशा मार्गांनी ही मागणी व्यक्त होते. या मागणीच्या पुरस्कर्त्यांना कोर्टाने दीर्घ मुदतीच्या कारावासाची शिक्षा ऑक्टोबरमध्ये केली हे तात्कालिक कारण सध्याच्या निदर्शनांमागे आहे.

**ब्रिटन** सध्याचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन ब्रिटनने युरोपिअन युनिअनमधून तातडीने बाहेर पडावे यासाठी अधीर आहेत. पण या प्रश्नावर पुन्हा एकदा सार्वमत घ्यावे आणि लोकांचा कौल घ्यावा या मागणीसाठी लंडनमध्ये मोठे मोर्चे जुलैपासून ऑक्टोबरपर्यंत चालू आहेत.

### आफ्रिका

**अल्जीरिया** या उत्तर आफ्रिकन देशात गेली २० वर्षे अब्दल अझीझ बूतेफ्लिकाची हुकूमशाही लष्करी पाठिंब्यावर

चालू होती. दर निवडणुकीत तो ८५%-९०% मतांनी निवडून येई.या वर्षी त्याने परत एकदा अध्यक्ष होण्याचा इरादा जाहीर केला. हा माणूस ८२ वर्षांचा, विकलांग व व्हील-चेअरवर. त्या इराद्याविरुद्ध देशभर निदर्शने सुरू झाली. परिणामत: त्याने माघार घेतली. पण त्याच्या जागी आपले बाहुले बसवण्याचा लष्कराचा व हितसंबंधीयांचा प्रयत्न चालू राहिला. डिसेंबरमध्ये निवडणुका होतील त्यात त्यांचेच उमेदवार असतील. या विरुद्ध लोकांचा संताप आहे आणि आता दर शुक्रवारी देशभर होणाऱ्या निषेधांचा सततचा ३९ वा आठवडा आहे.

**मध्यपूर्व**

**लेबनॉन** सरकारने whatsappसारख्या social messages वर कर जाहीर केला. ऑक्टोबर-पासून त्याविरुद्ध मोठे निषेध चालू आहेत. कर रद्द करूनही निषेध थांबले नाहीत. त्यामुळे पंतप्रधानाने राजीनामाही दिला. पण भ्रष्टाचारी संपूर्ण राजकीय प्रस्थापित वर्गाची हकालपट्टी ही मागणी कायम आहे. त्यांनी आता संसदच बंद पाडली आहे.

**इराक** भ्रष्टाचार, बेरोजगारी आणि एकूणच राजकीय व्यवस्था बदलण्यासाठी निषेध सुरु झाले. ते पोलीस विरुद्ध निषेधक असे हिंसक होऊन ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यातच १५० हून अधिक बळी गेले.

**इराण** पेट्रोलच्या किमती वाढवल्यावरून नोव्हेंबरमध्ये निषेध सुरु झाले. इराण मध्ये Revolutionary Guard हे सरकारचेच अत्यंत दमनकारी खाते आहे. त्यांनी निषेध न थांबल्यास कारवाईची धमकी दिली. कारवाई म्हणजे निषेधकांच्या हत्या किंवा विनाचौकशी बेमुदत हिंसक तुरुंगवास. ही कारवाई सुरू झाली असावीही. कारण पहिल्या काही दिवसातच शंभरहून जास्त लोक मारले गेल्याचा amnesty international चा अंदाज आहे.

## आशिया

**पाकिस्तान** महागाई, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची जाचक धोरणे, भ्रष्टाचार व इम्रान खानच्या निवडणुकीतील हेराफेरी याविरुद्ध लाखोंनी २७ ऑक्टोबरपासून राजधानीत धरणे धरले. इम्रान खानने पदत्याग करावा ही प्रमुख मागणी. [इम्रान स्वत: याच मार्गाने सत्तेवर आला.पण त्याला लष्करी पाठिंबा होता.] आता एक मागणी लष्कराने सरकारातील हस्तक्षेप थांबवावा अशीही आहे. ती स्वागतार्ह पण ही निदर्शने कट्टर मुस्लिम संघटनांनी सुरु केली आहेत त्यामुळे लोकशाही दूरच, धार्मिक आतंकवादाला खतपाणी मिळेल. नोव्हेंबरमध्ये राजधानीतील धरणे हलवून देशभर रास्ता रोको सुरु झाला.

**हाँगकाँग** मूलत: चीनच्या अरेरावीचा निषेध जूनपासून सतत चालू आहे. तो आटोक्यात आणणे स्थानिक सरकारला जमत नाही हे पाहून आता चीनने त्याचे सैन्य रस्त्यावर आणले आहे. या अशांततेमुळे हाँगकाँगची अर्थव्यवस्था धोक्यात आली आहे.

**खुलासे** या व इतर निषेधांचा आढावा घेता यामागे एक सूत्र दिसत नाही. अंशत: खुलासे बरेच आहेत.

द इकॉनॉमिस्ट तीन प्रमुख खुलासे देतो. पहिला अर्थातच आर्थिक विषमता. त्याचा उल्लेख लेखाच्या सुरुवातीला केला.डाव्या विचारसरणीनुसार गेली चाळीस वर्षे देशामागून देश नव-उदारमतवादी धोरणे अंगीकारत आहे. त्याचा सोप्या भाषेत परिणाम म्हणजे व्यवस्था चालते ती गरीबाच्या जीवावर. तो वरच्या स्तराच्या ख्यालीखुशालीची, चैनीची किंमत मोजतो. या परिस्थितीत अगदी नाममात्र भाववाढही उंटाच्या पाठीवरची शेवटची काडी ठरते आणि लोक संतापतात. चिलीमध्ये मेट्रोचे तिकीट फक्त चार टक्केने वाढले पण रोजचा ताळमेळ बसवायला ओढाताण होणारा वर्ग त्यामुळे रस्त्यावर आला.

दुसरा खुलासा लोकसंख्येच्या वयाचा. आज जगातील लोकांचे सरासरी वय तीस वर्षेतून कमी आहे आणि एक-तृतीयांश वीसहून कमी वयाचे आहेत. ही पिढी शिकलेली आहे, पदवीधर आहे, जागतिक घडामोडींबाबत सजग आहे, तिला नोकऱ्या उपलब्ध नाहीत.

तिसरा जरा असमाधानकारक पण अंशत: शक्य असलेला खुलासा म्हणजे परकीय शक्तीची देशाच्या अंतर्गत राजकारणात ढवळाढवळ. उदा. सध्या नेपाळमध्ये भारताविरुद्ध होणाऱ्या निदर्शनाचे कारण म्हणजे चीनची चिथावणी असावी. किंवा, वर उल्लेख केलेल्या चिलीमध्ये क्युबा, व्हेनेझुएला या जवळच्या समाजवादी राष्ट्रांचा छुपा हस्तक्षेप असणे शक्य आहे. कारण त्यांना स्वत: च्या अंतर्गत असंतोषापासून लक्ष दुसरीकडे वेधायचे आहे. उलटपक्षी

(पान ३६ वर)

Marathi-Monthly - Andolan Shashwat Vikasasathi, Editor-Medha Patkar. Postal Regn. No. MCE/296/2018-20
RNI No. MAHMAR/2009/30128 Licence to Post without Prepayment No. MR/Tech WPP/East/358/2019
Date of Publication 1st of every month Date of Posting 1st of every month Posted at Dadar P.O. 400014.

नागालँडमध्ये कलम ३७१ (ए) नुसार तिथल्या मूळ लोकांना संरक्षण देण्यात आलं आहे. तिथे बाहेरचे कोणी जमीन विकत घेऊ शकत नाहीत, प्रॉपर्टी करता येत नाहीत, नागांच्या सहकार्याशिवाय राहात येत नाही, नागा भागीदार असल्याशिवाय व्यवसाय करता येत नाही. तरीही उत्तर प्रदेश-बिहारमधून लोक इथे आले आहेत. वीस-तीस, अगदी चाळीस वर्षेही राहिले आहेत. बरेच जण मजुरी करतात. मुळात इथले नागा लोक मेहनत करणारे नाहीत, त्यामुळे मेहनतीची मदार या प्लेन लोकांवर आहे. नागा मालकांकडे हे प्लेन मजुरी करतात. काही प्लेन लोक व्यवसायही करतात, त्यांचे भागीदार नागा आहेत. कुणाचं हॉटेल आहे, कुणाची सराफी पेढी आहे, कुणी वर्तमानपत्रांचं वितरण करतं, तर कुणी राइस मिल चालवतं. १९९६ मध्ये इथे स्थलांतरितांविरुद्ध मोठं आंदोलन झालं होतं. पण आता मात्र सगळे मिळून मिसळून राहातात.

या मिळून मिळून राहाण्याचीच खरी गंमत आहे. नागालँडमध्ये बहुसंख्य आहेत ते ख्रिश्चन. गोमांस खाणारे, डुकराचं मांसही खाणारे. इथे उत्तर प्रदेश आणि बिहारमधले काही जण शाकाहारी, तर काही मासे आणि कोंबडी खाणारे. दोन्ही समूह एकमेकांचे पूजापाठ, प्रार्थना, सणवार यात सामील होतात. पण नागा पूजेला आले तरी प्लेन लोक त्यांना प्रसाद देत नाहीत. ते गोमांस खातात ना! त्यांच्यासह खाण्यापिण्याचे व्यवहार होत नाहीत.

नागांमध्ये जात-धर्म भेद नाहीत, अस्पृश्यता नाही. आपापल्या राज्यात या भेदांचे चटके बसलेल्या अनेक स्थलांतरितांना त्यामुळे इथेच राहाण्याची इच्छा आहे. पण त्याचबरोबर भेदाभेद नसलेल्या या समूहाबद्दल नाराजी व्यक्त करणारे महाभागही भेटतात! 'यांच्यात भेद नाहीत, कोण वरचा कोण खालचा हे कळत नाही आणि त्यामुळे कुणाशी कसं वागावं ते ठरवता येत नाही. जातिव्यवस्थेमध्ये कुणाला किती मान द्यायचा हे ठरवता येतं,' असं म्हणणाऱ्यांना काय बोलणार ?

**(जगभर... पान ३३ वरून)**

बोलिव्हियात तो हस्तक्षेप अमेरिकासहित बाहेरच्या भांडवलशाहीचा. सध्याच्या हाँग काँग मधील अशांततेमागे अमेरिका आहे असा चीनचा दावा आहे.

या सार्वजनिक असंतोषाला पोषक घटकांची नोंदही घ्यायला हवी. इंटरनेटमुळे लोक मोठ्या संख्येने अल्पावधीत जमा करणे सहजशक्य झाले आहे. तसेच विरोधी मत दाबणे तितकेच सहजशक्य झाले आहे. मग 'सत्ताधारी आमचे कधीच ऐकत नाहीत' या भावनेला खतपाणी मिळते [त्यात तथ्य असो किंवा नसो.] लोकशाहीवरचा विश्वास डळमळीत होणे हाही महत्त्वाचा घटक आहे. कोणत्याही राजकीय पक्षावर विश्वास नाही' ही लोकशाही देशांतील धारणा बळावत आहे. कारण चार-पाच वर्षांनी मत देता येणार तोपर्यंत जग बदललेले असते. शिवाय, पर्यावरणासारख्या प्रश्नावर एकटा देश काही करू शकत नाही, मग एक मत तर कस्पटासमान.

एकूण चित्र पाहता असे स्थानिक विस्फोट वाढणार. ते तीव्र झालेच तर तात्पुरती मलमपट्टी होत राहीलही.

www.art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk

To,

'शाश्वत विकास न्यास'च्या मालकीचा 'आंदोलन - शाश्वत विकासासाठी'चा हा अंक संपादक, मुद्रक, प्रकाशक मेधा पाटकर यांनी 'श्री गुरुकृपा प्रिंटर्स' १२१, अलाइड इंडस्ट्रियल इस्टेट, राम पंजवानी मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे छापून दादर, मुंबई येथून प्रकाशित केला.
**प्रेषक : २९-३०, पहिला मजला, 'ए' विंग, हाजी हबीब बिल्डींग, नायगाव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४.**